VP 0079

समाजाधिष्ठित शिक्षणाची संकल्पना

वसंत पळशीकर

(वसंत पळशीकर महाराष्ट्र व त्या बाहेरील अनेक स्वयंसेवी संस्था व कार्यकर्त्यांशी जोडलेले आहेत. आपले विचार मराठीतून अनेक लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य ते गेली अनेक वर्ष सातत्याने करत आहेत. पुण्यात ना. ग. नारळकर फौंडेशनने सुरू केलेल्या 'अक्षर नंदन' या शाळेचे ते समिती सदस्य आहेत. शाळा ही समाजापासून तुटलेली एक वेगळी संस्था नसून ती समाज बांधण्याच्या प्रक्रियेतील एक महत्वाचा हिस्सा बनू शकते, ही भूमिका लेखात त्यांनी स्पष्टपणे मांडली आहे.)

--१--

'समाजाधिष्ठित शिक्षण', 'समाजाशी अनुबंध असलेली शाळा' या प्रकारचे शब्दप्रयोग इंग्रजीतील 'Community based education', Neighbourhood School' यांच्यावरून मराठीत प्रचारात आलेले आहेत. आपली पहिलीच अडचण अशी आहे की 'कम्युनिटी' ला नेमका असा मराठी प्रतिशब्द नाही. 'समाज' या शब्दाची व्याप्ती खूप अधिक आहे. Village Community असे म्हणावयाचे असेल तिथे आपण 'गाव-समाज' हा शब्दप्रयोग करू शकतो. पण लहानमोठ्या शहरांच्या संदर्भात काय ? आपल्या समाजाची रचना आत्ता आत्तापर्यंत जात-जमात या घटकांना धरून झालेली होती. वस्त्याही बव्हंशी जात-जमातवार असत. नानासाहेब गोरे यांनी 'आमची आळी' असा एक छोटा सुरेख निबंध 'रचना' द्वै मासिकात चाळीस पंचेचाळीस वर्षांपूर्वी लिहिला. पुण्यातली ही आळी म्हणजे एक छोटी 'कम्युनिटी' होती. तशाच एका 'कम्युनिटी' चं उदाहरण म्हणून पु. ल. देशपांडे यांच्या 'बटाट्याच्या चाळी' चा उल्लेख करता येईल. तूर्त आपण खेडी बाजूला ठेवू. या करणाने की कम्युनिटी = गाव-समाज असे समीकरण आजही तेथे काम देते. आपण शहरांचा विचार करू. वस्ती किंवा पेठ किंवा मोहल्ला हे शब्द आपल्या परिचयाचे आहेत. दुसऱ्या महायुध्दापूर्वीचे पुणे शहर डोळ्यापुढे आणता येते का, पहा. आठवडयांच्या सात दिवसांनी ओळखल्या जाणाऱ्या सात पेठा, शिवाय सदाशिव, नाना, कसबा, गंज अशा इतरही पेठा होत्या. आजचे शिवाजीनगर हे भांबुर्डे गाव होते. कॅंप (छावणी) ही अगदी वेगळीच वसाहत होते, लष्कराभोवती उभारलेली. तसा डेक्कन जिमखानाही. पुण्याच्या अशा पेठा/वस्त्या यांना उद्देशून कम्युनिटी हा शब्द आपण अर्थपूर्णरित्या वापरू शकलो असतो. 'गाव-समाजा'शी जुळत्या मिळत्या अशा काही गोष्टी तेथे आढळल्या असत्या, की ज्यामुळे एकजिनसीपणा, आपलेपणा, इतरांपासूनचा वेगळेपणा अधोरेखित होत असे. उदाहरणार्थ, 'सदाशिवपेठी संस्कृती' हा शब्दप्रयोग असे सूचित करतो की, पुण्याच्या सदाशिव, नारायण, शनिवार अशा काही पेठांमधील ब्राम्हण समाज ही सामाजिक-सांस्कृतिक, धार्मिक, जातीय दृष्टया एक कम्युनिटी होती. ब्राम्हण व हिंदू असूनही डेक्कन जिमखान्यावरील बंगलेवाली मंडळी ही 'सदाशिवपेठी' कम्युनिटीचा भाग मानली जात नसत. त्यांची लोकमान्य टिळकांनी 'माळावरचे महारोगी' अशी एकेकाळी संभावना केली होती ! स्वत:च्या समाजापासून तुटलेले, महारोग्यांप्रमाणे लांब जाऊन राहणारे हे सुधारक, असे त्यांना म्हणावयाचे होते. मुद्दा असा की; आधुनिकीकरण व 'विकास' यांच्या आवर्तात सापडण्यापूर्वीच्या शहरांमधील 'कम्युनिटी' चा नकाशा काढणे शक्य होते. वस्ती, पेठ, मोहल्ला यांना हे रूप/आकार होता. अशा कम्युनिटीच्या पोटात 'आमची आळी' बटाट्याची चाळ' या आणखी छोट्या, घटक कम्युनिटी असत.

तुलनेने आजची शहरे डोळ्यासमोर आणा. पत्रांवरील पत्त्याचा भाग म्हणून पुण्यात पेठांची नावे शिल्लक राहिलेली आहेत. पण कम्युनिटीपण क्षीण होत चालले आहे. अजूनही वस्ती जेवढी जात-जमातीधिष्ठित, वा गरीब वा कमी आधुनिक तेवढे कम्युनिटी या अर्थाने समाजपण जास्त प्रमाणात टिकून राहिलेले दिसेल. पण 'विकासा' ची दिशा समाजपणा सैल पडत पडत नष्ट होण्याची आहे असे आढळेल.

आपण दुसऱ्या टोकापासूनही सुरूवात करून विचार करू. मोठ्या शहरांमध्ये आज नित्य नवी 'उपनगरे' नि 'झोपडपट्टया' उभ्या राहताहेत. काही काही गृहबांधणी सोसायटया, आहे.

गृहनिर्माण मंडळाच्या वसाहती इतक्या मोठ्या असतात की लोकसंख्येच्या दृष्टीने ती गावेच असतात. बंगला वा फ्लॅट संस्कृती असा नवा शब्दप्रयोग रूढ होत आहे. यांची रचनाच जाणीवपूर्वक अशी केली असते की पुरेसा तुटकपणा व खाजगीपणा प्रत्येकाचा टिकून राहावा. त्यांचे रूपांतर 'बटाटयाच्या चाळी'त होणे जवळपास अशक्य असते. ऐहिक व भावनात्मक पातळीवर परस्परालंबन, परस्परातील गुंतणूक शून्यावर आणून ठेवता आले तर ते हवे असते. पण अर्थात एवढे अलिप्तपणे राहणे माणसांना शक्य होत नाही. 'झोपडपट्टयां' मध्ये कुटुंबांना एकमेकांना धरून राहणे परिस्थितीमुळे आवश्यकच असते. पायात पाय अडकल्यासारखे असतात. त्यामुळे 'समाजपण' हवे असो वा नसो, ते निर्माण होते, व स्वीकारावे लागते.

अलीकडे सुस्थितीतल्या उच्चशिक्षित कुटुंबातील, खास करून, मुलगे नोकरी-व्यवसायानिमित्त सहजपणे परदेशांमध्ये जातात. अनेक जण तेथे स्थायिकही होतात. त्यापैकी अनेकजण आपले भारतीय नागरिकत्व कायम ठेवतात तर काही त्या त्या देशांचे नागरिक बनतात. 'सामाजिक चलनवलन' (Social mobility) असे याला म्हटले जाते. देशांतर्गतही असे चलनवलन पुष्कळ वाढले आहे. आयुष्यभर एका गावी, एका कंपनीत/ठिकाणी, स्थिरपणे न राहण्याकडे कल आहे. एका गावात जरी माणूस राहिला तरी तो घरे बदलत राहतो. त्याची मिळकत बदलते, प्रतिष्ठा/दर्जा बदलतो, सोय-गैरसोय बदलते तशी घरे, वस्त्या बदलल्या जातात. 'कोठेच मुळे रूजू न देणे' हे सूत्र आहे.

आधुनिकतेच्या तत्वांवर आधारित समाजात नागरिक-व्यक्ती आणि राष्ट्रव्यापी समाज (राज्यसत्ता) यांच्या मधील विभिन्न स्तरांवरील समुदायांना स्थान नाही. प्रशासनाच्या सोयीसाठी विभाग पाडले जातात. शहराची वॉर्डवार विभागणी केली जाते. लोकप्रतिनिधींच्या निवडीसाठी मतदार संघ निर्माण केले जातात. या दोहोंच्या सीमा बदलल्या जात असतात. काही गोष्टींसाठी शासनाला 'कुटुंब' हा समुदाय अजून समुदाय म्हणून स्वीकारावा लागतो. ही राज्यसत्तेची मजबूरी आहे. तिथेही १८ वर्षाच्या वयाच्या मुला-मुलींना सज्ञानत्व बहाल करून, मतदानाचा अधिकार देऊन कुटुंबावरही प्रहार केला आहेच.

एवढया तपशीलात आपण हा मुद्दा का करीत आहोत, असा प्रश्न पडेल तर, त्याचे स्पष्टीकरण काहीसे पुढीलप्रमाणे देता येईल. ज्यांना शिक्षण हे 'कम्युनिटी' वर अधिष्ठीत असावे, 'नेबरहुड स्कूल्स' असावीत असे वाटते त्यांच्या समोर हा मोठा पेच आहे की, समाजाच्या वाटचालीची आजची दिशा ही कम्युनिटी, नेबरहुड यांना छेद देणारी आहे.

--२--

हा मुद्दा इथेच तूर्त सोडून देऊन 'समाजाधिष्ठित शिक्षण' याचा आणखी एक अर्थ अनेकांच्या मनात आहे. त्याकडे वळू या. समाजात आज अनेक अंगांनी उच्चनीचता, सांस्कृतिक, विषमता, श्रेणीबध्दता आढळते. आर्थिक, सामाजिक, भाषिक, धार्मिक, राजकीय सत्तेच्या अंगाने वगैरे. या भेदाभेदांमुळे न्याय, समानता या तत्वांच्या आधारे एकरस, एकात्म (unified, integrated) समाज निर्माण होऊ शकत नाही. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीच्या आड येणाऱ्या या गोष्टी आहेत. शिक्षणाच्या क्षेत्रात आपणास असे आढळते की शहराच्या त्याच एका भागात राहणारी सर्व कुटुंबे आपल्या मुलांना जवळच्या शाळेमध्ये पाठवीत नाहीत. शाळा व महाविद्यालये, दोन्ही स्तरांवर, उच्चनीच, उच्चभ्रू व सामान्य गुणवत्तासंपन्न व निकृष्ट अशी दोन ते चार स्तरांमध्ये विभागणी झालेली आहे. मोठ्या शहरांमध्ये हे त्रैवर्ण्य वा चातुर्वर्ण्य पुढीलप्रमाणे आढळते. १) इंग्रजी माध्यमाच्या श्रीमंती उच्चभ्रू शाळा, २) मराठी माध्यमाच्या नामवंत शाळांमधील इंग्रजी विभाग, ३) मराठी माध्यमाच्या नामवंत शाळा, 'कॉन्व्हेंट' शाळा (इंग्रजी माध्यमाच्या), ४) उरलेल्या शाळा, या 'चतुर्थ वर्णीय' शाळापलीकडे महानगरपालिका/जिल्हा परिषदेच्या शाळांची स्थिती 'पंचम वर्णीयां' सारखी आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रातली ही वर्णव्यवस्था मोडून काढण्यासाठी काही वेळा 'समाजाधिष्ठित शिक्षण', 'नेबरहुड स्कूल' ची गोष्ट केली गेली आहे. जातपात, धर्म, उत्पन्न, पालकांचे शिक्षण, दर्जा/व्यवसाय या बाबतीतले भेद कोणतेही व कितीही असोत, एका भागात राहणाऱ्या सर्वांची मुले जर त्याच एका शाळेत आली तर ते परिवर्तनाला चालना देणारे, एकात्म व समताधिष्ठित समाज निर्माण करणारे शिक्षण ठरेल असे अनेकांना वाटते. सर्व भेद गौण, एक'समाज' तेवढा खरा; भारतीय समाजाला निष्ठा तेवढी इष्ट व प्रशंसनीय, अशी भूमिका रूजविण्यासाठी शिक्षणाची अशी 'समाजाधिष्ठित' पुनर्रचना आवश्यक आहे अशी ही मांडणी आहे.

आपण वर ज्या समाजपणाची, कम्युनिटीची गोष्ट करीत होतो त्यापेक्षा समाजाधिष्ठिततेच्या येथील अर्थ मूलतः वेगळा आहे हे ध्यानात घेण्याची आवश्यकता आहे. येथे समाज = राज्यसत्ता = राष्ट्र असे समीकरण प्रस्थापित होते.

समाजाधिष्ठितता निर्माण करण्यासाठी व्यक्ती व कुटुंब यांच्या निवडीच्या स्वातंत्र्याचा लोप जबरीने करण्याची गोष्ट अभिप्रेत आहे. याचे एक गमक असे की, हे धोरण अमलात आणण्यासाठी एक ना एक प्रकारे साऱ्या शिक्षणव्यवस्थेचे सरकारीकरण/राष्ट्रीयीकरण करावे लागेल. 'समाजाधिष्ठित शिक्षणा'ची गोष्ट करणाऱ्यांना सर्व शाळांचे व शिक्षणाचे एकछाप प्रमाणीकरण (regimented standardization) आवश्यक वाटते; ते याचा पुरस्कार समतेच्या तत्त्वाचा आधार घेऊन करीत असतात.

यामध्ये शिक्षणाचे सरकारीकरण जसे होईल तसे शिक्षणाचे 'सामूहिकीकरण' (collectivisation) होईल. एकेकाळी रशिया व चीन या देशांमध्ये शेतीचे सामुहिकीकरण असे झाले होते. यामधून वरकरणी समता प्रस्थापित झाल्यासारखी भासते. पण व्यवहारात दडपणूक व छळणूक यावर आधारित एक विषम व्यवस्था प्रस्थापित होते. भारतात या प्रकारची व्यवस्था प्रस्थापित करावयाची तर प्रथम येथील लोकशाही व्यवस्था नष्ट करावी लागेल. तसे केल्यावरही, वरिष्ठ वर्ग आपली वेगळी व्यवस्था लावून घेणारच नाही याची खात्री नाही.

या अर्थाने समाजाधिष्ठित शिक्षणाची मांडणी येथे आपण करीत नाही. किंबहुना, त्या प्रकारच्या शिक्षणाला राज्यशासन नियंत्रित शिक्षण म्हणणे अधिक योग्य होईल (State-controlled or Statist)

पोथीनिष्ठ डाव्या भूमिकेमधून ज्यावेळी समाजाधिष्ठित शिक्षणाची गोष्ट केली जाते तेव्हा एक ना एक प्रकारच्या स्टेटिस्ट समाजाच्या उभारणीचीच गोष्ट केली जात असते. केंद्रीय सत्तेच्या नियंत्रणाखालील व व्यवस्थापनाखालील समाजाच्या प्रस्थापनेचे एक साधन म्हणून समाजाधिष्ठित शिक्षणाची गोष्ट केली जाते.

येथे एवढी स्पष्टता पुरे आहे की, समाजाधिष्ठित शिक्षणाची माझी कल्पना ही नाही. राज्यसत्तेने लादलेली कोणतीही व्यवस्था ही खऱ्या अर्थाने समाजाधिष्ठित असते असे मी मानीत नाही.

--३--

आधुनिकतेवर आधारित समाजाचे वळण कम्युनिटीला नाकारणारे असल्याने, समाजाधिष्ठित शिक्षणाची गोष्ट आपण करतो तेव्हा आधुनिक वळणाची वरिष्ठ थरातली मंडळी काही प्रकारचे प्रश्न विचारतील. त्यांचाही आपण येथे विचार करायला हवा.

समुदायाधिष्ठित (Community based) शिक्षण असावे याचा नव्या संदर्भात अर्थ कसा करायचा.? शिक्षण या पायावर उभारावे याचा आग्रह तरी का धरायचा ? मी जेथे राहतो त्याचा आसपास राहणाऱ्या भिन्न जाति-जमातींच्या, सामाजिक-धार्मिक-भाषिक पार्श्वभूमीच्या, भिन्न आर्थिक स्थितीतल्या, कुटुंबात शिक्षणाची कमीअधिक परंपरा असलेल्या कुटुबासंह माझा एक आत्मीय समुदाय आहे असे मी अट्टाहासाने कशासाठी मानावयाचे ? असे काही नाते त्यांच्या सोबत माझे नाही, आणि ठेवण्याची मला आतून तीव्र ऊर्मी नाही व गरजही वाटत नाही, असे मी अनुभवतोत्र. माझी ज्यांच्याशी 'समाजपणा' च्या पातळीवर आत्मीयता आहे, वा ज्यांच्यापैकी मी पण एक आहे असे मला वाटते, त्यांची मुले पाचदहा मैलांवरील विशिष्ट शाळेत जात असली तर त्या शाळेत माझी मुले पाठवणे हे स्वाभाविक व योग्य का नाही? सर्व प्रकारच्या मुलांसोबत माझ्या मुलांचे शिक्षण करून मी त्यांच्या भविष्याच्या उज्वल संधी का हिरावून घेऊ ? पुण्यातील इंग्रजी माध्यमाच्या उच्चभ्रूतम शाळेत मुले पाठविणाऱ्यांचे पालक म्हणतील की, आमचा एक आत्मीय समुदाय आहे, आमचे हितसंबंधही एकसारखे आहेत, आमच्यात परस्पर आत्मीयतेची भावना पण आहे, म्हणून तर जास्त वेळ, पैसा व श्रम खर्ची घालून आम्ही आमच्या मुलांना अमुक-अमुक शाळेत घालतो. आमचा हा हक्क तुम्ही का नाकारता.?

आपल्या मनात समुदायाधिष्ठित शिक्षण म्हणत असताना एक भौगोलिक आणि एक संमिश्रतेचे अशी दोन परिमाणे आहेत. आपण असे गृहीत धरले आहे की, वस्ती, पेठ, मोहल्ला, उपनगरीय वसाहत अशा एकेका भौगोलिक परिसरात राहणाऱ्यांची मुले एका 'नेबरहुड' शाळेत असावीत. 'नेबरहुड' चा अर्थ स्पष्ट आहे. शेजारधर्मीय संबंध ज्यांच्याशी असतो अशा कुटुंबाचा बृहत परिवार या अर्थाची वस्ती. दुसरे असेही गृहीत असते की सामाजिक-सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक-जातजमातीय दृष्टया एकसारखेपणा नसलेल्या कुटुंबाची ती वस्ती असेल. कारण जात जमातवार, भाषा धर्मवार, उत्पन्न-व्यवसाय वर जर वसाहती असत्या आणि त्यांच्या 'नेबरहुड' शाळा असत्या तर आपल्या मनातले उद्दिष्ट सफल होणार नाही.

दुसऱ्या अर्थाच्या 'नेबरहुड' शाळांमध्ये आम्ही मुले का म्हणून पाठवावीत, या प्रश्नाचे उत्तर आपण अद्याप दिलेले नाही. असा प्रश्न विचारणारे पालक हे आधुनिकतेचे वळण उत्साहाने अंगिकारलेले असण्याची शक्यता जास्त आहे. तेव्हा, समताधिष्ठित समाजाच्या प्रस्थापनेसाठी त्या आवश्यक आहेत, हे उत्तर त्यांचे समाधान करणार नाही.

गेल्या शे दिडशे वर्षामध्ये पाश्चिमात्य देशांमध्ये जी औद्योगिक-आर्थिक व राजकीय वाटचाल झालेली आहे, तिची सांगड भारतातील उच्चशिक्षित पांढरपेशा वर्गाच्या मनात विकास, समृध्दी, प्रगती, उत्कर्ष, भरभराट, उच्च जीवनसरणी, good life, या संकल्पनांशी घातली गेली आहे. व्यक्ती स्वातंत्र्याच्या आधारे, व्यक्तीच्या निवडीनुसार घडून येणारे चलन-वलन (mobility) ही एक चांगली, इष्ट व आवश्यक गोष्ट म्हणून पाहिली गेली आहे. Global Community, globalisation या संकल्पनांचे आकर्षण किती आहे ते आपण 'नव्या आर्थिक धोरणांच्या संदर्भात अनुभवीत आहोत.

तात्पर्य असे की, सामाजिक समता व एकात्मता, विभिन्न जाती-जमाती, धर्मीय समाजामध्ये राष्ट्रीय एकता, आर्थिक दृष्टया भिन्न वर्गामध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी 'नेबरहुड' शाळांचा पुरस्कार आधुनिक वळणाच्या, उच्चवर्गीय कुटुंबांना मान्य होणार नाही.

मुद्दा येथे पुरा होत नाही. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सत्ता-मत्ता-प्रतिष्ठावान उच्चभ्रू श्रेष्ठी वर्गाची एक एकात्म बृहत कम्युनिटी आकाराला येत आहे. भारतात तिला एकस्तंभ बनविणारी शक्ती (unifying cementing force) इंग्रजी भाषा, आधुनिक पश्चिमी सभ्यता व आधुनिक जीवनशैली यांनी मिळून बनणारे रसायन हीच आहे. या श्रेष्ठी वर्गात भारतातील विभिन्न जाती-जमातीमधील, धर्मांमधील, भाविक व प्रादेशिक समाजांमधील कुटुंबे कमी अधिक प्रमाणात दाखल झाली आहेत व होत आहेत. प्रत्येक शहरामध्ये, विशेषत: मोठया शहरांमध्ये, या वर्गाचे अस्तित्व पहावयास मिळते.

या वर्धिष्णू, बलिष्ठ वर्गाची भक्कम बांधणी करण्याचे एक प्रमुख व प्रभावी हत्यार/माध्यम साहेबी बनणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळा हे आहे.

एकाच भारतीय समाजात दोन 'उपराष्ट्रे' निर्माण करणारी ही प्रक्रिया समाज व राष्ट्र यांना दुभंगणारी ही प्रक्रिया आहे. तिने आज वेग घेतला आहे.

या श्रेष्ठी वर्गात समाविष्ट असलेल्या वा हक्क दाखल होऊ इच्छिणाऱ्या आकांक्षी कुटुबांना व सामाजिक भरांना वरील दुसऱ्या अर्थाच्या नेबरहुड शाळांचे महत्व, त्यांची निवड कशी पटवून द्यावयाची ? त्यांचेही हित या दुसऱ्या प्रकारच्या समाजाधिष्ठित शिक्षणामध्ये आहे हे कसे दाखवून द्यावयाचे. ?

--४--

या प्रश्नाचे माझे उत्तर असे : माणसाचे माणूसपण, त्याचे मन:स्वास्थ्य, त्याचे पूर्णत्व (wholeness), त्याची माणुसकी व भलेपण हे एका गोतावळयात, समुदायात (Community) आपलेपणाने खोलवर रूजलेले असण्यावर नाना अंगानी अवलंबून असते. हे रूजलेपण अनेकपदरी नात्यांवर, शेजारधर्मीय संबंधांवर, एका 'भूमी' शी

आपलेपणाने, हक्काने जोडलेले असण्यावर अवलंबून असते: अशा प्रकारे माणूस जेव्हा रूजलेला (rooted) नसतो तेव्हा तो एक ना एक समुदायाचा नसतो (when he does not belong some where), तेव्हा तो उपरा बिनबुडाचा, बिनचेहेऱ्याचा बनू लागतो. The faceless crowd हा शब्दप्रयोग आधुनिक शहरवासियांना उद्देशून केला गेला आहे. 'The lonely crowd' हे अमेरिकन समाजावरील डेव्हिड रीझनन (Riesman) यांच्या प्रख्यात समाजशास्त्रीय ग्रंथाचे शीर्षक आहे. याचा ताण माणसावर येऊ लागतो. त्याच्या ठायी एक कायमची अस्थिरता, बेचैनी/अस्वस्थता, असुरक्षितता, भयग्रस्तता उत्पन्न होते. यामधून तो एका बाजूला कमालीचा स्वयंकेंद्री, स्वार्थी, आक्रमक, स्पर्धाळू इत्यादी बनतो. दुसऱ्या बाजुला तो हिंस्र, विध्वंसक बनतो. आतून तो फुटत, शतखंडीत होत जातो.

सारा समाज जेव्हा असा बनतो तेव्हा, अनेकदा, राष्ट्राचा सन्मान व गौरव, वंश वा संस्कृती यांचे श्रेष्ठत्व, गतेतिहासाचे स्मरण व पुररूज्जीवन या व अशाच मुद्यांना पुढे करून लोकांचा कौल सर्वाच्या हुकूमशाहीच्या बाजूने मिळवता येतो. हिटलरच्या नाझी जर्मनीचे उदाहरण तसे ताजे व ठळक आहेच. भारतातही अशा प्रकारची आवाहने देव, धर्म, भाषा, वंश, इतिहास, संस्कृती या नावांनी झुंडशाहीची ताकद उभी करू शकत असल्याचे आपण अनुभवले आहे, अनुभवीत आहोत. मग वरकरणी 'लोकशाही' असते पण प्रत्यक्षात झुंडशाही अस्तित्वात येते. झुंडीमध्ये माणसे स्वत:चे माणूसपण परत प्राप्त झाल्याचे (Larger than life या प्रमाणावर Scale) अनुभवतात. एकत्व व सांघिकत्व, पूर्णत्व, रूजलेपण, समाजपण यांचा हवा हवा असणारा प्रत्यय त्यांना येतो. अर्थात याचा विर्घृण, स्वार्थी, महत्वाकांक्षी वापर हुकूमशहा करून घेतात.

आणखी एका अंगाने याचा विचार आपणास करता येईल. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर हे विकाराचे तीव्र रूप धारण करतात तेव्हा ते माणसांचे प्रबळ षड्रिपू बनतात. प्रत्येक मानवी ऊर्मीचा एक इष्ट आकार आहे, जो जीवनधारणेच्या संदर्भात उपकारक असतो. या ऊर्मीचा (impulse) योग्य, उपकारक आकार व आविष्कार हीच (सु) संस्कृती. या ऊर्मी विकार बनतात तेव्हा विकृती उत्पन्न होते. माणसाचे 'माणूसपण' सुसंस्कृत असण्यात व राहण्यात आहे. एका समुदायात रूजलेला असण्यातून माणूस जे समाजपण जगतो ते समाजपण त्याच्या ऊर्मीनी विकारांचे रूप धारण न होऊ देण्यास सर्वात जास्त सहाय्यभूत होते. नातेसंस्था मधून समाजपण निर्माण होते; जेथे नाती नाहीत तेथे समाज नसतो.

आता, कोणी असे म्हणेल की, आधुनिक वळणाच्या आजच्या माणसांचेही संबंध असतातच की सोयीपुरते, कामापुरते, हितसंबंध साधण्या वा ध्येये साध्य करण्यापुरते, असे जे नाना प्रकारचे संबंध आपले असतात त्यांना राजीखुशीच्या 'करारा'चे रूप असते. सर्व संबंध कारारात्मक (contractual) असावेत ही खास आधुनिकतेची भूमिका आहे. इतके की, विवाहसंबंध हाही एक करारच , असे विविहाकडे पहावे असे आज म्हटले जाते. करारात्मक संबंध आणि 'नाती' यांमधील अंतर ध्यानात घेऊ या. श्री. नानासाहेब गोरे यांनी 'आमची आळी' निबंधात वा श्री. पु. ल. देशपांडे यांची 'बटाटयाची चाळ' पुस्तकात रेखाटलेले संबंध हे कारारात्मक नाहीत. रक्ताच्या नात्यांसारखेच ते नाते संबंध बनलेले असतात. एका समुदयात / परिवारात एकत्रे बांधणारे ते बंध असतात. या नातेसंबंधानी ती आळी वा ती चाळ एक समुदाय / परिवार म्हणून आकार घेते. टिकून राहते. या नात्यांव्दारे माणसे एकामेकांची सुख दु:खे वाटून घेतात. आनंद वाढवितात, मत्सर करतांना, हेवेदावे असतांना, भांडतात तेव्हाही त्यांचे नातेसंबंध या सगळया पलिकडे त्यांना आधार देत राहतातच. भावनात्मक, भौतिक व आध्यात्मिकही, नातेसंबंध हे जसा आधार असते तसे बंधनही असते. त्याचा प्रसंगी चांगलाच काचही होतो. व्यक्तीला समष्टीशी जोडलेले राहणे अनिवार्य असते.

त्या समष्टीनेच शिक्षक समाजाधिष्ठित असावे. शिक्षणाव्दार त्याचे व्यक्तित्व तोललेले राहते. जेव्हा आधुनिकतेच्या चौकटीत अनिर्बंध व्यक्तिस्वातंत्र्याच्या संकल्पनेच्या आधारे सर्व प्रकारचे नातेसंबंध नाकारून करारात्मक संबंधच तेवढे मान्यता पावतात तेव्हा 'समाजपण' लोप पावेल. जॉर्ज ऑर्वेल यांच्या '1984' या कादंबरीतले वा आल्डस हक्स्ली यांच्या 'Brave New World' या कादंबरीतले अ-मानुष, केंद्रिय सत्तेव्दारा व्यवस्थापित असे जग अस्तित्वात येईल. मग वैचारिक धारणा व वादप्रणाली कोणत्याही असोत. सुदैवाने, माणसे करारांपलिकडील नाती जोडू पहात राहतात, जोडतात. म्हणूनच अजून पूर्ण अ-मानुष जग निर्माण झालेले नाही.

तेव्हा, 'समाजपणा' ची (Community ची) गोष्ट आपण करीत आहोत त्यावेळी आपण करारात्मक संबंधांची गोष्ट करीत नाही. आपण नात्यांची गोष्ट करीत आहोत हे स्पष्ट आहे. माणसांचे सर्वच संबंध रक्ताच्या नात्याच्या प्रकारातले फक्त आदिम टोळीसमाजात तेवढे असतात; सर्व मोठ्या संमिश्र व नागर समाजांमध्ये अनेक संबंध व्यवहारापुरते, करारात्मक राहणे अटळ आहे. पण, म्हणूनच, समाजपण निर्माण करणाऱ्या नात्यांच्या संबंधामध्ये माणूस भक्कमपणे रूजलेला राहणे जास्तच आवश्यक आहे. त्याच्या व समाजाच्या भल्याच्या दृष्टीने.

नातेसंबंध आणि मैत्री, ध्येयवादाने जोडलेले संबंध यातला फरकही जाणला पाहिजे. नाते नाकारता येत नाही, तोडता येत नाही; त्याचे ऋण व बंधन मानावेच लागते, हे त्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. म्हणूनच blood is thicker then water ही म्हण प्रचारात आहे. 'बटयाटयाची चाळी' ला एक आत्मीय समुदायाचे रूप प्राप्त होण्याचे कारण चाळकऱ्यांचे संबंध हे सोयीपुरते, व्यवहारापुरते, मैत्रीपुरते, स्वभाव/विचार पटताहेत तोवरचे नाहीत; अस्तित्वाचाच एक अविभाज्य अंगभुत भाग म्हणून ते संबंध आहेत. या अर्थाने ते रक्तांच्या नात्याच्या कोटीच्या जवळपास जाणारे आहेत. या प्रकारच्या नातेसंबंधाच्या आधाराने माणूस उभा असतो, एरवी तो कोसळतो. एकांत कोठडी ही मृत्युपेक्षा अधिक भयंकर सजा म्हणून दिली जाते त्यामागे ही जाण आहे.

या भूमिकेमधून मी वरील विभागात निर्देश केलेल्या मंडळीना असे विचारीन की, 'समाजपणाच्या पातळीवर आत्मीय नातेसंबंध असलेल्या तुमचा समुदाय कोणता', कारण तुम्ही तर नातेसंबंधावर समाज अधिष्ठित नसावा, याच आधुनिक, पश्चिमी, व्यक्तीवादी भूमिकेला आपलेसे केले आहेत ना ? मुलांसाठी शाळा निवडतांना तुम्ही, स्वत:चे व मुलांचे हितसंबंध जास्तीत जास्त कसे साधले जातील हाच विचार करता ना ? ऐहिक-सामाजिक उत्कर्षाच्या, चलनवलनाच्या (Social mobility) आणि climbing higher and higher an the Socio economic political leader आड येतील अशा प्रकारचे नातेसंबंध कोणाशीच फार खोलवर जोडू नयेत ही शिकवण मुलांना दिली जात नाही काय ? एरवी तुमच्या वर्तुळातील अनेकानेक कुटुंबामधली मुलेमुली इतक्या सहजी परदेशांमध्ये 'करियर' करायला जाताना आढळली असती कां. ? ती त्या त्या देशांच्या समाजामध्ये स्वत:ची पाळेमुळे रूजवून एकरूप होतांना दिसत नाहीत, ते कां. ?

इंग्रजी भाषा, आधुनिक पश्चिमी सभ्यता व आधुनिक जीवन शैली हे रसायन जो एक नवा श्रेष्ठी वर्ग निर्माण करीत आहे त्याचा व्यवहार बांडगुळा-सारखा, उर्वरित समाजाचे शोषण करणारा होत आहे. हे तर आहेच. पण हे तुटलेपण, हे नातेसंबंधांवर आधारलेल्या कोणत्याच समाजात रूजलेले नसणे यामधून व्यक्तीत्वाच्या व जीवनाच्या गाभ्याशी एक पोकळी, रितेपण, उत्पन्न झाले आहे. बिनबुडाचे बनल्याचा अनुभव माणसांना अस्वस्थ व भयग्रस्त करीत आहे. नाना प्रकारच्या उपभोगांमध्ये, मनोरंजन करमणुकीच्या नाना नवनव्या प्रकारांमध्ये वाढ करीत राहूनही मनस्वास्थ, मन:शांती लाभत नाही. विपश्यना, योग, ऋषिमुनींची धार्मिक प्रवचने, Godmen यांचे भलेबुरे पीक उदंड येत आहे. याचेही एक स्पष्टीकरण तर हेच आहे.

शिक्षण समाजाधिष्ठित असावे, शिक्षणाव्दारे माणसे लहानमोठया समुदायांमध्ये 'रूजावीत', एकात्म बनावीत, नातेसंबंधांनी समाजाशी जोडली जावीत ही गोष्ट सर्वांच्याच हिताची आहे. एकेक भौगोलिक परिसरामध्ये, क्षेत्रामध्ये राहणाऱ्या सर्वांचा मिळून समाज (Community) बनत असतो. जसा गाव-समाज. वृहत् समाजाची रचना 'पूर्णामध्ये पूर्ण' (whole within wholes) अशी असावयास हवी. यापैकी एका लहान, स्थानिक समाजनामक 'पूर्णा मध्ये मुळे रूजवण्याचे शिक्षण मुलांना त्यांच्या संस्कारक्षम वयात मिळणे अगत्याचे आहे. ही गोष्ट वरील दुसऱ्या अर्थाच्या नेबरहुड शाळांव्दाराच साध्य होऊ शकते.

आजच्या घडीला हे उत्तर ज्यांना पटेल अशांची संख्या खूप कमी आहे ही गोष्ट स्पष्ट आहे. ती मोकळेपणाने मान्य करायला हवी. व्यक्ती जीवनात जो तुटकपणा येत आहे, जी बेचैनी, चिंता व भय घेरत आहे, हिंस्त्रतेचा जो अनुभव येत आहे, नाना प्रकारचे ताण व त्यामधून जडणाऱ्या व्याधी (Stress - induced dieseases) हैराण करीत आहेत त्यांचा संबंध माणसे समाजव्यवस्थेच्या व संस्कृतीच्या बदललेल्या वळणाशी जोडत नाहीत. या गोष्टींचे खापर ते कधी दैवावर, कधी राजकर्त्यांवर, कधी काही जाती वा धर्मिक जमाती यांना 'दुष्ट, खलनायक' म्हणून त्यांच्यावर फोडतात.

--५--

महाराष्ट्रातील कित्येक शाळा ध्येयवादी शिक्षकांच्या गटांनी स्थापन केल्या. याचे आद्य उदाहरण, पुण्याच्या 'न्यु इंग्लिश स्कुल'चे म्हणता येईल. चिपळूणकर - टिळक - आगरकर या त्रयीपासून स्फूर्ती घेऊन नंतरच्या काळात जागोजाग अशा शाळा काढल्या गेल्या. खुद्द जीवन शिक्षण मंडळाचे असेच उदाहरण आहे. पण डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या 'न्यु इंग्लिश स्कूल चे तेजही लौकरच ओसरले. तत्कालीन परकीय ब्रिटिश राजवटीपासून स्वत:चे स्वतंत्रपण टिकविण्याचे पथ्य न सांभाळण्याचा हा परिणाम होता. अशी टीका लोकमान्यांनी त्याही वेळी केल्याचे आढळते. शासनाचा आश्रय व शासनाचे निमंत्रण शाळा व शिक्षक समुदाय यांना समाजाधिष्ठित राहण्यापासून कळत - नकळत परावृत्त करतात. ही गोष्ट स्वांतत्र्योत्तर काळात विशेष ध्यानात आली आहे. आता आपलेच सरकार आहे, लोकशाही राजवट आहे, शासन समाजाचेच प्रतिनिधित्व करते, समाजाच्या आशा आंकाक्षा, ध्येये यांनाच साकार करण्याचे काम शासन करते, हे व यासारखे मुक्तीवाद परीचित आहेत. आधुनिक केंद्रीभूत राज्यसत्ता लोकशाही व्यवस्थेत लोकांकडून मतदानाव्दारे संमती प्राप्त करून घेते आणि मंत्रीगण हे लोकनियुक्त असतात, औपचारिकत: ही गोष्ट खरी. पण ही राज्यसत्ता नोकरशाहीच्या मार्फत समाजावर राज्य करीत असते, आणि समाजाचे स्वातंत्र्य समाजपण तिच्या वाढत्या हस्तक्षेपाबरोबर खच्ची होत जाते, हे वास्तव आहे. शाळा कॉलेजे यांना उत्तरोत्तर 'पदवीधर' उत्पादन करणाऱ्या कराखान्यांचे रूप आले आहे, आणि शिक्षणाच्या क्षेत्रात उद्योजकांची आज चालती आहे, हे आपण पाहतो आहोतच. ध्येयवादाने प्रेरित होऊन सुरू केलेल्या शाळा ही कारखान्यांमध्ये रूपांतरीत होत आहेत. आजचे शिक्षणमहर्षि हे यशस्वी उद्योगपतीच आहेत. आणि तेही स्वत:कडे उद्योजक म्हणूनच बघतात.

आणि ही गोष्ट स्वाभविकच आहे. शिक्षण ही आजच्या आधुनिक, विकासवादी शासव्यवस्थेची एक उपव्यवस्था बनली आहे. शिक्षणखात्याच्या नियंत्रणाखाली व तिच्या आश्रयाने शिक्षण एकछाप व प्रमाणित (regimented and standardised) बनले आहे. साऱ्या समाजाला एकात्म बनविण्याच्या नावे ही घडामोड होत असली तरी, या प्रकारच्या शिक्षणाच्या विस्ताराने आणि प्रसाराने सामाजिकता एकात्मता व समाजाचे एकात्मक संघटन वाढीस लागलेले नाही. समाजात फुटीरपणा वाढलाच आहे.

आपण ग्रामीण शाळांचा विचार करू. स्वातंत्र्यपूर्व काळात व नंतरही सुमारे पंधरा एक वर्षेपर्यंत कर्मवीर

भाऊराव पाटील यांच्यासारख्या च्या प्रेरणेने, समाजाचे पुनरूस्थान व अभ्युदय घडवून आणण्याच्या ध्येयाने गावात शाळा काढली जात असे. गाव-समाज व शाळा परस्परांचे पोषण करत असत आणि शिक्षकाला गुरूजी म्हणून मोठा मान असे. सुधारणेच्या कामांचे पुढारीपण त्यांच्याकडे असे.

यात फरक पडला तो आर्थिक विकास, आधुनिकीकरण व लोकशाहीच्या संगतीने वाढलेले/सत्तास्पर्धेचे व लाभांचे राजकारण या प्रक्रियांमुळे, गांव, समाज यांच्या पुनरूस्थानाच्याऐवजी व्यक्तिगत वा गट/जात यांच्या भरभराटीसाठी माणसे जास्त विचार करू लागली. शाळा, महाविद्यालये ही गरजूंना नोकऱ्या-चाकऱ्या देऊन उपकृत करण्याची, स्वत:च्या सत्तेचे अड्डे बनविण्याची, सत्तेचे राजकारण करण्यासाठी वापरून घेण्याची साधने बनली.

वरील दोन्ही उदाहरणांवरून पुढील गोष्ट ध्यानात येते. 'समाजाधिष्ठित शाळा तसेच समाजाधिष्ठित शिक्षण' या दोन्हींचा भरवसा ध्येयदृष्टी असलेल्या निष्ठावंत, कल्पक व जिद्दी शिक्षकांवर, समाजातील काही धुरीणांचा पाठिंबा मिळण्यावर, आणि अशा शाळांची वाढ होण्यासाठी एक अनुकूल वातावरण असण्यावर आहे. यात शिक्षक हा सर्वात महत्वाचा घटक होय. आजच्या परिस्थितीत तीन घटक सर्वाधिक प्रतिकूल असे आहेत. लोकशाहीच्या नावावर फोफावलेले वैयक्तिक व गटबाजीचे सत्ताकांक्षी राजकारण, शिक्षण खात्याच्या माध्यमामधून शिक्षणाचे झालेले यांत्रिकीकरण व सरकारीकरण आणि 'न्याय्य हक्क' प्राप्त करून घेण्यासाठी उत्पन्न झालेले सर्व समाजघटकांचे परस्परकलह व संघर्ष यांचे राजकरण. शिक्षक या मध्यवर्ती व प्राणभूत घटकाचा विचार केला तर, शिक्षकी पेशाचे आज सापेक्षत: जास्त प्रमाणात धंदेवाईकीकरण झालेले आढळते. पोटार्थी नाकरी म्हणूनच बंव्हंशी व्यक्ती या व्यवसायाकडे वळतात. मूल्याधिष्ठित निष्ठावंत पेशा (Vocation) या दृष्टीने काम करणाऱ्या व्यक्ती विरळ आहेत.

अशा एकंदर प्रतिकूल परिस्थितीत समजापण जोपासणाऱ्या व समुदायांच्या निर्मितीसाठी प्रयत्नशील असणाऱ्या शाळा कशा स्थापन होतील ? त्यांचा आधार काय असेल. ? समाजात वेगवेगळया पातळयांवर समाजपण जोपासण्याची, ते समाजपण आविष्कृत करणाऱ्या समुदायांची बांधणी करण्याची गरज ज्यांना तीव्रतेने जाणवते आहे अशा व्यक्तींच्या एकत्र येऊन केलेल्या सामूहिक प्रयत्नांमधून अशा वेगळया वाटेने जाऊ पहाणाऱ्या छोटया शाळा वा शाळासदृश 'अनौपचारिक' शैक्षणिक उपक्रम या स्वरूपात ही चळवळ आकारास येऊ शकेल.

समुदायकेंद्री समाज व्यवस्था (Community Social Order) हे ध्येय उराशी बाळगणाऱ्या मंडळीकडून हे काम होईल. अशा समाजव्यवस्थेसाठी आवश्यक काही घटक आधुनिक पूर्व काळातील भारतीय समाजव्यवस्थेत आढळतात. पण भविष्यात अशी व्यवस्था निर्माण करीत असतांना ब्रिटिश-पूर्व काळातील भारतीय समाजव्यवस्थेचे पुनरूज्जीवन करावे ह्या अर्थ मला अभिप्रेत नाही, ही गोष्ट आवर्जून सांगावयास हवी.

आधुनिक कालखंडातील घडामोडीमुळे जो फरक पडलेला आहे. त्यातल्या तीन घटकांचा येथे निर्देश करता येईल. व्यक्तीस्वातंत्र्य, न्याय्य, समता ही मूल्ये आज जगभर प्रतिष्ठित झाली आहेत. तंत्रवैज्ञानिक बैठक पण बदलली आहे. दळणवळणाच्या, वाइतुक व संप्रेषण (Transport and Communication) दोन्ही अंगांनी साधनांचा एकच मुद्दा घेतला तरी फरक स्पष्ट होईल. आजचे युग हे विज्ञानयुग आहे असेही याचे वर्णन करता येईल. जगभरच्या लोकांची व संस्कृतीची प्रचंड घुसळण झाली आहे. तेव्हा सरळसरळ पुनरूज्जीवन शक्यही नाही. तुरळक अपवाद सोडले तर कोणाला ते नकोही आहे.

यांचा एकत्रित परिणाम काय झाला आहे ? तर मानवजातीला जाणीवपूर्वक निवड करून वैयक्तिक व सामुहिक पातळीवर जीवनाला आकार देण्याची, भविष्य

घडविण्याची जबाबदारी उचलण्याखेरीज व ती यशस्वीपणे पेलण्याखेरीज गत्यंतर उरलेले नाही.

स्पर्धेच्या जागी सहकार, समतेच्या जोडीला बंधुभाव, अहंकेंद्री व्यक्तीवाद टाळून व्यक्तीची स्वायत्तता, हक्कांच्या आधी कर्तव्यबुध्दी, सेवाभाव व विश्वास्तवृत्ती, एकछाय प्रमाणित समाजव्यवस्था जीवनशैलीच्या जागी वैविध्याने नटलेल्या संस्कृती व जीवनशैली, आटोपशीर मानवी वस्त्या (जागर व ग्रामीण), पर्यावरणीय व्यवस्थांचे रक्षण व संवर्धन, मानवेतर जीवसृष्टीविषयी आत्मीयता व आदर, सर्वभूतहितवृत्ती, अशा गोष्टींची निवड करण्याची गरज निकडीची बनलेली आहे, असे मी म्हणेन या तत्वांवर व उद्दिष्टांवर अधिष्ठित समाजाचा उभारणीसाठी अनुरूप असे तंत्रविज्ञान निवडावे व घडवावे लागेल. समुदायाधिष्ठित समाजात ही तत्वे व उद्दिष्टे साध्य होतील असे मी म्हणेन.

अशा समाजाच्या उभारणीमध्ये ज्यांना आस्था आहे अशा व्यक्ती व गटांनी अशा प्रकारच्या शाळा व शैक्षणिक उपक्रम देशात अनेक ठिकाणी, वाढत्या प्रतिकूल परिस्थितीतही आज निष्ठेने चालविले जात आहेत.

कोल्हापूर येथे प्राचार्या लीला पाटील यांनी चालवलेली 'बालसृजन-आनंद' ही शैक्षणिक चळवळ व शाळा, फलटण येथे मॅक्सिन बर्न्सन यांनी अनेक वर्षे निष्ठेने चालविलेली शाळा, वर्धा जिल्ह्यात चेतना विकास या संस्थेचे अनौपचारिक शिक्षणाच्या क्षेत्रातील कार्य, अशाच स्वरूपाचे बेळगाव जिल्ह्यात जनजागरण या गटाचे गेल्या १५ ते १७ वर्षाचे कार्य, पुण्यात अलिकडे सुरू झालेली नारळकर फाऊंडेशनची 'अक्षर-नंदन' ही शाळा अशी काही उदाहरणे महाराष्ट्रातच वा सीमेवर आहेत. गुजरातमध्ये गिजुंभाई बधेका, महात्मा गांधी यांच्या प्रेरणेने सुरू झालेल्या अनेक शैक्षणिक संस्थाचाही निर्देश करता येईल. बंगलोरजवळील जेन साही यांनी चालविलेली 'सीता स्कूल', बंगलोरमधेच चालणाऱ्या सेंटर फॉर लर्निंग, विकासना, या शाळा, निलगिरी टेकड्यांमधील गुडलूर येथील 'विद्योदय' ही शाळा, उत्तर प्रदेशातील अलमोडा जिल्ह्यातल्या कौसानी येथील 'लक्ष्मी आश्रम' यांचाही निर्देश करता येईल.

अशा सर्व शाळा व उपक्रम यांची संख्या व मान इतके अत्यल्प आहे की हसण्यावारी त्यांना बादही करता येईल. शिक्षण क्षेत्रातील परिवर्तनाची गंगोत्री ठरण्यासाठी आवश्यक तेवढी शक्ती यांना अद्यापी प्राप्त झालेली नाही, ही गोष्ट खरीच आहे.

—७—

समुदायांचे अधिष्ठान नाकारणाऱ्या समाजव्यवस्था व संस्कृती यांच्या पार्श्वभूमीवर अशा शिक्षणाची गोष्ट करावयाची याचा एक अर्थ असा की, असे समुदाय व त्यांना धारण करणारे समाजपण निर्माण करणारी शाळा ही कारक शक्ती (gency) म्हणून तिचा विचार आपणांस करावयास हवा.

आज ज्या शाळा आहेत, विशषत: जनसामान्यांची मुले ज्या साधारण शाळांमध्ये (non-elite) जातात त्या शाळा या प्रकारचे कार्य करण्याच्या दृष्टीने समाजपणाचे अधिष्ठान मिळण्याची या शाळांची गरज सर्वात अधिक असते. दुसऱ्या अंगाने, पारंपारिक संस्कार व वळण आजही जास्त प्रमाणात जनसामान्यांमध्ये टिकून असल्याने आणि परिस्थितीच्या दडपणामुळेही समुदायपण काही अंगांनी त्यांच्या वस्त्यामध्ये जास्त प्रमाणात टिकून राहिलेले असल्याने, अशा शाळांना 'समाजाधिष्ठित' रूप व आशय देणे तुलनेने अधिक सोपे जायला हवे. समाजाचे रहाटगाडगे चालविण्याचा बोजा माय थंरावर जास्त पडतो, आणि पोटापाण्याच्या व नित्याच्या व्यवहारांच्या चिंतेने त्यांना ग्रासलेले व पीडलेले असते म्हणून त्यांची परिस्थिती बिकट असते.

यांची एकदोन मोठी विदारक अशी गमके पुढीलप्रमाणे सांगता येतील. ज्यांना आपण 'उध्वस्त कुटुंबे' म्हणू अशांचे प्रमाण शहरातील व ग्रामीण भागातील अगदी तळागाळाच्या थरांमध्ये जास्त आढळते. घराघरातल्या 'कर्त्या' पुरूषाकडून

घराची जबाबदारी वेगवेगळ्या करणांमुळे पेलली न गेल्याने ही स्थिती सामान्यत: निर्माण होते, रोजगार नियमित न मिळणे, व्यसनीपणा, पंगुत्व अशी वेगवेगळी कारणे आढळतात. दुसरे गमक असे की, घरातील सर्वांनाच कमाईसाठी बाहेर पडावे लागत असल्याने मुलांचा सांभाळ, त्यांचे संगोपन व शिक्षण करण्यासाठी लागणारी उसंत कोणाला नसते. मुले रामभरोसे सोडून दिल्यासारखी असतात. मुले मुलांच्या एका स्वतंत्र, काहीशा अनिर्बंध जगात लहानाची मोठी होतात. अशा वस्त्यांमध्ये 'बळी तो कान पिळी' हाच उघडपणे न्याय म्हणून वावरत असल्याने जीवनात उघड स्वरूपातील हिंसेचे प्रमाण तुलनेने अधिक आढळते. जीवन कठोर, निर्दय व निर्घृण असते.

त्याच वेळी या थरांमधल्या लोकांना जगण्यासाठीच परस्पांचा आधार घेण्याची, परस्परांना सांभाळून घेण्याची गरज पुष्कळ जास्त असते. मनुष्याच्या ठायी अंगभूत असलेल्या चांगुलपणा, करूणा, माणूसकी या सद्भावांची अभिव्यक्ती विलक्षण हृदयस्पर्शीपणे होताना आढळते. कलकत्ता शहरामधील 'आनंदनगर' नावाच्या झोपडपट्टीतील समुदायाच्या जीवनाचे चित्रण करणारे 'सिटी ऑफ जॉय' हे पुस्तक ज्यांनी वाचले असेल त्यांना मी काय म्हणत आहे ते समजेल.

अशा थरांमधून/वस्त्यांमधून ज्या शाळांमध्ये मुले जातात त्या शाळांना 'समाताधिष्ठित' बनवता येण्याची संभाव्य क्षमता (Potential) जास्त असते असे म्हणता येईल. पण अर्थातच, हे आव्हान पेलणे अवघड कामही आहे. मुलांमध्ये 'वांडपणा' चांगलाच मुरलेला असतो, कारण व्यवहारातल्या जीवघेण्या स्पर्धा संघर्षात टिकून राहण्यासाठी, यशस्वी होण्यासाठी त्या गुणांची आवश्यकता असते.

अमेरिकेतील बहुधा, न्यूयॉर्क शहरातील शाळेचा एका ध्येयनिष्ठ व 'पेटलेल्या' मुख्याध्यापकाच्या धैर्यशील, कल्पक व सहानुभावपूर्ण नेतृत्वामुळे काही काळ कायापालट कसा झाला त्याची अत्यंत प्रेरक काहाणी लैला बर्ग या लेखिकेने 'डेथ ऑफ द लायंझिंग हिल स्कूल' (Death of th lisinghill School) या पुस्तकात सांगितली आहे. ज्य शाळेतल्या मुलांना शाळा हा कैदखाना वाटत असे आणि म्हणून शाळेतल्या सामानाची मोडतोड करण्यात, बेशिस्त वर्तन करून शिक्षकांना सळो की पळो करून सोडण्यात धन्य वाटत असेल तीच मुले शाळेचा-'आपली शाळा' म्हणून कशी अभिमान बाळगू लागली. ज्या वस्तीला / पालकांन शाळेशी त्यांचे काही देणे घेणे आहे असे वाटत नव्हते. शाळ ही एका परक्या (alien), लादलेल्या व्यवस्थेचा भाग आहे असे वाटत होते, ते पालक व ती वस्ती शाळेशी जैविक व आत्मीय संबंधानी जोडली गेली. हयाचे हद्य व उदबोधक चित्रण पुस्कात येते.

अशा शाळेची काही व्यवच्छेदक लक्षणे व गुणवैशिष्टये कोणती असतील. ? अशी शाळा जाणीवपूर्वक (महाराष्ट्रात असेल तर) मराठी माध्यमाचा अंगीकार करील मातृभाषा शिक्षणाचे माध्यम म्हणून निवडण्यामागे, मराठी समाज, मराठी संस्कृती व परंपरा यांच्याशी हा आपला समाज, ही आपली माणसे, या भूमीत आपली पाळेमुळे ही दृष्टी असेल. अवतीभवतीच्या परिसरात राहणाऱ्या सर्व सामाजिक, आर्थिक स्तरांमधील, धार्मिक समुदायांमधील मुले शाळेत येतील, व मुलांच्या शाळेत येण्यामुळे त्या परिसरातल्या कुटुंबांमध्ये समुदायपण वाढीस लागेल. याकडे लक्ष असेल. स्वत:च्या मुलांना शाळेत घालणाऱ्या पालकांना सक्रिय सहभाग शाळेतले अनेकविध उपक्रम राबविण्यात, शिक्षणाच्या नित्याच्या प्रक्रियेतही मिळावा अशी दृष्टी व प्रयत्न असेल म्हणजे एका प्राथमिक व पायाभूत स्तरावर पाच उपसमुदाय अशा शाळेचे घटक असतील. त्यांच्यामध्ये अर्थपूर्ण संवाद, क्रिया प्रतिक्रिया व देवाणघेवाण घडत राहील. मुलांचा समुदाय, शिक्षकांचा समुदाय, पालकांच्या समुदाय, समाजाधिष्ठित शिक्षणाचे महत्व जाणणाऱ्या मंडळीचा समुदाय, आणि शाळेच्या भौगोलिक परिसरात राहणारा समाज, भौगोलिकदृष्टया शहराच्या ज्या

भागात शाळा असेल त्या भागातल्या सर्व आर्थिक वर्गामधील, सामाजिक-सांस्कृतिक व शैक्षणिक थरांमधील, जाती-जमातीमधील कुटुबांना शाळा व तिची वास्तु आपली वाटावी, ज्यांची मुले शाळेत नाहीत ती कुटुंबेही शाळेशी आत्मीयतेने जोडली जावीत अशी ही दृष्टी आहे. अनौपचारिक बहि:शाळा स्वरूपाच्या (Non-formal extra-curricular) विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याच्या व्दारा ही गोष्ट साध्य करावी लागेल. ग्रंथालय, प्रयोगशाळा, कार्यानुभव केंद्र हस्तोद्योग व कला यांचे वर्ग, भाषा संवर्धन केंद्र, अशा प्रकारच्या गोष्टींव्दारा परिसरातील मुले व पालक यांच्यासाठी शाळा हे 'सुविधा केंद्र' (Facilitation Centre) बनावे अशी योजना आहे.

आज घराघरातील मुले शाळेत येतात. पण शाळा क्वचितच मुलांच्या 'घरा'मध्ये पोचतात. मूल्ये, विचार, ध्येये, समस्यांवरील कल्पक, अभिनव उपाय यांच्या व्दारा अधिक पुढचा टप्पा शाळा (मुले व शिक्षक) परिसरातील समाजाच्या जीवनात, अडीअडचणींमध्ये, समस्याच्या सोडवणूकीमध्ये सहभागी होऊन गाठेल. याची तपशीलात नेमकी मांडणी करण्याची गरज आहे. व तशी ती करता येईलही.

शाळा समजाला आकार देऊ शकेल का, ते तिचे कार्य आहे का, असा प्रश्न विचारला जाईल. समाजाला आकार देणाऱ्या सामाजिक संस्था अनेक आहेत. शाळा ही एकमेव व प्रधान संस्था नाही. पण शाळा (म्हणजे शिक्षणाची प्रक्रिया जेथे चालते ती संस्था) ही समाजाला आकार देणाऱ्या संस्थापैकी एक आहे यात काही शंका नाही. ते केवळ एक धंदेवाईक उत्पादक वा सेवा (production or service) कार्य बनता कामा नये. तसे ते जेव्हा बनते तेव्हा negatively ते समाजाला घडवित - म्हणजे बिघडवीत असतेच. शाळेने अधिक विधायक भूमिका पार पाडायला हवीच.

शिक्षणखात्याच्या नियंतत्रणाखाली आज शिक्षण एकछाप व प्रमाणित झाले आहे (regimented and standardised) शिक्षण सरकाराश्रित बनले आहे. शिक्षक हे शासकीय कार्मचारीच बव्हंशी बनले आहेत. नोकरशाही यंत्रणेची पकड सर्वकाय व घट्ट बनत आहे याला प्रतिक्रिया म्हणून शिक्षक स्वत:ला 'बौध्दिक कामगार' समजून कामगार संघटना बांधताना, व शिक्षणेतर मुद्यांवरून शासनाशी संघर्ष करताना आढळतात. समाजाधिष्ठित शिक्षणाच्या आड येणारी ही सर्वात मोठी धोंड आहे. शिक्षणाचे कार्य शासन मुक्त होऊन पालक व समाज यांच्या विचारपूर्वक दिलेल्या सहभागावर व लोकाश्रयावर उभे करणे ही निकड आहे. पालक व शिक्षक यांच्या सर्जकतेला व कर्तृत्वाला हे आव्हान आहे.

सुविचार

शिक्षकांनी स्वत:च स्वत:चे निरिक्षण करावे मी चालतो कसा ? माझे वर्तन कसे ? माझे शरीर कसे ? माझी बुध्दी कशी ? माझे ज्ञान किती ? माझ विद्यार्थ्यावर प्रेम आहे काय ? मी माझ्या व्यवसायाशी प्रामाणिक आहे काय ? रोज मी अभ्यास करतो काय ? विद्यार्थ्याचा चुका दुरूस्त करून त्यांच्यात परिवर्तन होते काय ? मी कोण मी कशासाठी ? मी कुणासाठी हया सर्व प्रश्नाचा साकल्याने विचार करून आत्मचिंतन करीत असणे हा महान शिक्षक होण्याचा मार्ग आहे.

डॉ. राधाकृष्णन